महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ११३ /२०२४ दि. ३० /०५/२०२४

## -: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :-

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे मतमोजणी अनुषंगाने दि. ०४/०६/२०२४ रोजी मतमोजणी केंद्र** परिसरात मोठया प्रमाणात नागरिक तसेच सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व अति महत्वाच्या व्यक्ती येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आनंदनगर जंक्शन येथे वाहतूक कोंडी होऊ नये याकरीता घोडबंदर रोडवर सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद करावा लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :-

**प्रवेश बंद –** १) मुंबई, ठाणे कडून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **कापूरबावडी जंक्शन येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदर वाहने कापूरबावडी वाहतूक शाखा जवळून उजवे वळण घेवून खारेगाव टोलनाका, मानकोली, अंजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) सदर वाहने कापूरबावडी जंक्शन जवळून उजवे वळण घेवून कशेळी, अंजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंबई, ठाणे कडून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **ज्युपीटर हॉस्पीटल व माजिवडा ब्रिजवर वाय जंक्शन येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने माजिवडा ब्रिजवरून खारेगाव टोलनाका, मानकोली, अंजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) मुंब्रा, कळवा कडून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **खारेगाव टोलनाका येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गॅमन मार्गे खारेगाव खाडी ब्रिजखालून खारेगाव टोलनाका, मानकोली, अंजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) नाशिक कडून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **मानकोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने वडपे नाका – भिवंडी – वाडा, विक्रमगड – मनोर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) गुजरात कडून मुंबई, ठाणे, कळवा, मुंब्रा कडे जाणा–या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **जव्हार फाटा, मनोर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मनोर – विक्रमगड – वाडा – भिवंडी – खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०४/०६/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वा. ते मतदान केंद्रावरील मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे/वागळे, प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.